**विशेष दिवाणी दावा क्र. ४८ / २०१९**

*CNR No. MHSO060005862019*

द्रौपदी वाघमोडे

*वि.*

बिरा कोकरे (मयत) वगैरे

**निशाणी क्र. ४४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांनी कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ४ चे कथन आहे की, वादीने दाव्यामध्ये बावची येथील शेतजमीन गट क्र. ३७/१, ३७/२, ३७/३ व ३७/४ या मिळकती समाविष्ट केलेल्या नाहीत. त्यामुळे दाव्यात सर्व मिळकती समाविष्ट केलेल्या नसल्याने कायद्याची बाधा येते व त्यामुळे दावा रद्द होण्यास पात्र आहे. सदरील दुरुस्ती कैफियतीमध्ये करण्याचे राहिलेले आहे. सबब, सदरील दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

०२. वादीने म्हणणे मांडले की, कैफियत दाखल करतेवेळी प्रस्तुतचा मजकूर कैफियतीमध्ये नमूद केलेला नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. कैफियत प्रतिवादी क्र. १ ते ७ व १० ते १३ यांनी दिलेली असल्याने केवळ प्रतिवादी क्र. ४ यांना दुरुस्ती करण्याचा अधिकार नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दुरुस्ती ही दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होण्यासाठी आवश्यक असल्यास त्यास परवानगी देणे योग्य असते. प्रतिवादी क्र. ४ करीत असलेल्या दुरुस्तीवरुन सदरील जमिनीच्या स्वरुपाबाबत काहीही बोध होत नाही. म्हणजे ती जमीन का दाव्यात समाविष्ट करावी व केली नसल्यास त्याचा काय परीणाम होणार आहे याबाबत अर्जामध्ये काहीही नमूद नाही. सबब, प्रस्तुतची दुरुस्ती केल्याने दाव्याच्या स्वरुपावर परीणाम होईल असे वाटत नाही. दावा हा वाटणी व ताब्याकरीता दाखल केलेला

आहे. प्रतिवादी समाविष्ट करु इच्छीत असलेल्या मिळकती या एकत्र कुटुंबाच्या आहेत अथवा स्वतंत्र आहेत याबाबत बोध अर्जावरुन होत नाही. सबब, संदिग्ध दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य वाटत नाही. सबब, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. प्रतिवादींना ते समाविष्ट करु इच्छीत असलेल्या मिळकतीचे स्वरुप स्पष्ट करुन पुन्हा नव्याने अर्ज देण्याची परवानगी याद्वारे देणे योग्य होईल. सदरील बाबीवरुन खरी परिस्थिती न्यायालयासमोर येऊ शकते. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. आवश्यकता असल्यास प्रतिवादी यांनी मिळकतींचे स्वरुप उघड करुन योग्य तो अर्ज करण्याची मुभा प्रतिवादीस देण्यात येते.

३. खुल्या न्यायालयात घोषीत.

स्वाक्षरी/–

दि. २२.१२.२०२३

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar, Grade – II |
| Name of the Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 22/12/2023 |
| Order uploaded on | : | 22/12/2023 |